N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/03/2023 21:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Date From (दिनांक पासून):** 08/03/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/03/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/03/2023 **Time (वेळ):** 20:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2023 20:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अधिक्षक वे,अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह ,प्राथमिक कार्यालय,जुने चेलीपुरा हायस्कुल, होळकरचौ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दत्तात्रय देवराव काळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काळे गल्ल, काळे गल्ली शिवना,ता सिल्लोड जि औरंगाबाद,वेदांत नगर, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काळे गल्ल, काळे गल्ली शिवना,ता सिल्लोड जि औरंगाबाद,वेदांत नगर, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9595773066

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. दिलीपकूमार परशराम जऊळकर | | | 1. राप्लट न,राप्लट नं 63 ए विंग, एन 4 सिडको औरंगाबाद ,एन 4 सिडको औरंगाबाद ,वेदांत नगर, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 08.03.2023

मी दत्तात्रय देवराव काळे वय 40 वर्ष व्यवसाय नोकरी शिक्षक गजानन प्राथमीक विदयालय शिवना ता सिल्लोड जि औरंगाबाद रा काळे गल्ली शिवना ता सिल्लोड जि औरंगाबाद मोबा.क्र 9595773066

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 06/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे येवुन मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे " मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहत असुन मी शिक्षक म्हणुन गजानन प्राथमीक विदयालय शिवना येथे सन 2003 पासुन नौकरी करतो. तसेच माझी पत्नी नामे अर्चना सखाराम लहाने ही सुध्दा माझ्या शाळेत शिक्षक म्हणुन सन 2008 पासुन नोकरीला आहे. आमची शाळा अनुदानित आहे.

मी माझे वडील देवराव काळे यांचे तीन वैद्यकीय बील जुलै2022 मध्ये तसेच माझी पत्नी नामे अर्चना सखाराम लहाने हिने तिचे अकरा वैद्यकीय बीले माहे जुन 2022 ते फेब्रवारी 2023 दरम्यान आमच्या शाळेमार्फत सर्व बाबीची पुर्तता करुन मा.वेतन अधिक्षक (प्राथमीक) भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद यांना सादर केले आहे.

सदर बील आदयापावेतो मंजुर न झाल्याने मी भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद येथे दिनांक 21/02/2023 रोजी जावुन श्री जऊळकर, वेतन अधिक्षक यांना जावुन भेटलो असता त्यांनी मला सांगीतले की "तुमचे वडीलांचे व पत्नीचे मिळुन एकुण 14 वैद्यकीय बीले असुन त्यांची एकत्रित रक्कम 663652/- रुपये होत आहे तरी तुमचे सर्व बील तुम्हाला हयाच महिण्यांत पाहिजे असेल तर तुम्ही मला तुमच्या वैद्यकीय बीलच्या 20 टक्के म्हणजे 132730/- रुपये एवढी रक्कम दयावी लागेल नाहीतर तुमचे वैद्यकीय बील तयार करुन ट्रेझरीमध्ये पाठविणार नाही तसेच त्रुटीवर परत करुन मंजुर होऊ देणार नाही " त्यावर मी त्यांना नाईलाजास्त हो म्हणुन नंतर येवुन भेटतो असे सांगुन निघुन आलो.

मला श्री.जऊळकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, औरंगाबाद येथे त्यांचे विरोधात तक्रार देण्यासाठी आलो आहे. मी. श्री जऊळकर यांना आज दिनांक 06/03/2023 रोजी भेटण्यासाठी जाणार असुन मी श्री. जऊळकर यांना भेटुन माझ्या वडीलांचे व पत्नीचे वैद्यकीय बिल मंजुर करणे बाबत बोलणार आहे. माझा श्री जऊळकर यांचे सोबत कोणताही पैशाचे उसनवारीचा अगर देण्या-घेण्याचा व्यवहार नाही तसेच वैर अगर दुश्मनी नाही. मी व माझ्या पत्नीचे आमच्या शाळेमार्फत मा. वेतन अधिक्षक (प्राथमिक) भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद यांना सादर केलेले वैदयकीय बीलचे कार्यालयीन प्रतची झेरॉक्स प्रत सोबत देत आहे.

तरी मला श्री जऊळकर यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी हि विनंती." अशा मजकुराची हस्तलिखीत तक्रार दिली त्यावर मी सही केली.

मी तक्रार दिल्या नंतर पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी पंचाना कार्यालयात बोलावुन घेवुन पंचांची व माझी ओळख करुन देवुन पंचांना माझी तक्रार वाचुन दाखवीली. त्यानंतर श्री राजपुत व पंचानी माझ्या समक्ष मी दिलेल्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर श्री जऊळकर यांची त्यांच्या कार्यालयात पंचासह जावुन भेट घेण्याचे ठरवुन व्हाईस रेकॉर्डच्या सहाय्याने पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करुन खात्री करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही सर्व लाचलुचपत कार्यालयातुन निघुन भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद कार्यालयाच्या जवळ सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलो. तेथे गेल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजपुत यांनी मला व पंच तसेच सापळा पथक यांना सुचना दिल्या.

पोलीस निरिक्षक श्री. राजपुत यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करीता वापरण्यांत येणारा व्हाईस रेकॉर्डर मला दाखवुन त्यांनी पंचासमक्ष त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन संभाषण कसे रेकॉर्ड केले जाते याबाबत पंचाना व मला

माहीती दिली. सदर व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे गळयात अडकवुन शर्टचे आत ठेवला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री. पुरी असे पायी निघुन भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद येथे जावुन श्री जऊळकर यांची त्यांच्या कॅबीनमध्ये भेट घेतली. तेव्हा आमच्या दोघांमध्ये कामासंबधाने चर्चा होवुन माझे वडीलांचे व पत्नीचे बील मंजुरीसाठी ट्रेझरी साठी पाठविणे बाबत बोलणे होवुन श्री जऊळकर यांनी सुरवातीला 20 टक्के प्रमाणे पैश्याची मागणी केली त्यानंतर 10 टक्के प्रमाणे मागणी केली त्यानंतर तडजोडी अंती 50000/- रुपये लाचमागणी करुन परवा म्हणजे दिनांक 08/03/2023 रोजी स्वीकारण्यांचे मान्य केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो तेव्हा पो कर्मचारी गुसिंगे यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर घेऊन बंद केला. त्यानंतर त्यात रेकॉर्ड झालेले संभाषण श्री राजपुत व पंचानी ऐकले. पो.नि.श्री. राजपुत यांना श्री जऊळकर हे 50000/-(पन्नास हजार) रुपये लाचेची मागणी करत असल्याची खात्री झाल्याने त्यंाना दिनांक 08/03/2023 रोजी लाच स्विकारतांना प्रत्यक्ष पकडण्याचे ठरविले. त्यानंतर मला, सापळा पथकातील सदस्य व पंचाना गोपनीयतेच्या सुचना देवुन आम्हाला दिनांक 08/03/2023 रोजी सकाळी 09.00 वाजता हजर राहण्याचे सांगीतले. तसेच मला येताना लाचेची रक्कम देण्यासाठी पन्नास हजार रुपये देखील सोबत आणण्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी, पंच तसेच सापळा पथकाचे सदस्य असे दिनांक 08/03/2023 रोजी सकाळी 09.00 वाजता ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे हजर आलो. त्यानंतर श्री राजपुत यांचे सुचने वरुन माझ्या कडील पन्नास हजार रुपये पाचशे रुपये 500/- दराच्या 100 नोटा असे एकुण पन्नास हजार रुपये ताब्यात घेवुन श्री राजपुत यांच्या कक्षेमध्ये पंचासमक्ष अंन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच पंचाना व मला सुचना दिल्या की, अंन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम श्री. जऊळकर यांनी स्विकारल्या नंतर डाव्या हाताने डाव्या खिश्यातील रुमाल काढुन तोंड पुसण्यास सांगितले. सदर नोटा माझ्या पॅन्टचे उजवे खिशात ठेवले व उजव्या हाताने काढुन देण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व ऍन्टी करप्शन कार्यालय येथुन निघुन भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय जवळ सुरक्षीत ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी पुन्हा श्री राजपुत यांनी आम्हाला पुन्हा थोडक्यात सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे गळयात अडकवुन शर्टचे आत ठेवला. त्यानंतर मी व पंच क्र.1 पुरी असे भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय येथे पहिल्या मजल्यावर गेलो माझ्या पाठीमागे आलेले सापळा पथकातील सर्वजन एकमेकांना दिसतील अशा रितीने भविष्य निर्वाह निधी पथक वेतन वितरक कार्यालय जिल्हा परिषद कार्यालयाचे पहिल्या मजल्याचे आवारात थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. पुरी असे श्री जऊळकर यांना त्यांच्या कक्षात जावुन भेटलो आमच्या मध्ये पुन्हा कामसंदभनि चर्चा झाल्यानंतर त्यांनी मला चर्चेदरम्यान सांगीतले की, आणा आणा तसेच किती आणले तसेच दया त्यानंतर मी माझ्या पॅन्टचे उजव्या खिश्यातुन लाचेची रक्कम पन्नास हजार काढुन त्यांच्या समोर धरले असता त्यांनी उजव्या हाताने स्वीकारुन दोन्ही हाताने हाताळुन त्यांच्या जवळ असलेल्या बॅगमध्ये ठेवले ती वेळ अंदाजे 12.04 वाजेच्या सुमाराची होती. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने पुर्व नियोजीत ईशारा केला. तेव्हा सापळा पथक तात्काळ सदर ठिकाणी आले. श्री. राजपुत यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर घेऊन बंद केला. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी श्री.जऊळकर यांना स्वतः व पंचाची, सापळा पथकाची ओळख करुन दिली. श्री.जऊळकर यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. दिलीपकूमार परशराम जऊळकर वय 50 वर्ष पद अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी प्राथमिक कार्यालय औरंगाबाद रा प्लॉट नं 63 ए विंग, एन - 4 सिडको औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर त्यांची पंचा समक्ष त्यांना अंन्थ्रासिन पावडर लागलेले पन्नास हजार रुपये लाचेची रक्कम बाबत विचारले असता त्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या बॅगमध्ये ठेवल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर बॅगमध्ये ठेवलेले पन्नास हजार पंच क्र.2 श्री. गुंजाळे यांनी बॅगमधुन काढुन श्री राजपुत यांच्या सुचनेप्रमाणे त्यांचे ताब्यात ठेवले. त्यानंतर कक्षातच काळया कपडयाचे सहाय्याने अंधार करुन पंचा समक्ष निळया रंगाच्या लाईटचे बॅटरीने पाहणी केली असता सदर नोटांवर व श्री. जऊळकर यांचे दोन्ही हाताचे बोटांना तसेच बॅगच्या एका खिश्यामध्ये आतील बाजुस व ठिक ठिकाणी अंन्थ्रासिन पावडरची रेडीयम सारखी चकाकी दिसुन आली. त्यानंतर श्री. जऊळकर यांना ताब्यात घेतले. त्याबाबतचा तसा सविस्तर पंचनामा सापळा पथकाने केला.

दिनांक 08/03/2023 रोजी 12.04 वाजेच्या सुमारास श्री. दिलीपकूमार परशराम जऊळकर वय 50 वर्ष पद अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी प्राथमिक कार्यालय औरंगाबाद रा प्लॉट नं 63 ए विंग एन 4 सिडको औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझे वडीलांचे व पत्नीचे वैदयकीय बील ट्रेझरीला पाठवुन मंजुर करुन देण्यांसाठी 50000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वत: स्विकारले असता पंचा समक्ष सापळा पथकाने जागीच पकडले आहे. तरी श्री. जऊळकर यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी हि विनंती.

मी दिलेली फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ही फिर्याद दिली म्हणुन मा. पो.नि.सो. यांचे आदेशाने कलम-7 भ्र.प्र.का.

-1988 प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी पो.नि./श्री. संदीप राजपुत ने.ला.प्र.वि.औरंगाबाद मो.नं. -9823235777 यांचेकडे दिला आहे. सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

BRAMHA SANTARAM GIRI(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

डि. ओ.आधिकारी
वेदांत नगर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BRAMHA SANTARAM
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)